माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

अपील क्रमांक : २८९५/२०१९

अपीलार्थी श्री.भामा बबन चुन्हे,
मु.पो. सौंदड, ता.सडक अर्जुनी/मोर जि.गोंदिया

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, अर्जुनी/मोर. ता.अर्जुनी/मोर जि.गोंदिया

प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, अर्जुनी/मोर. ता.अर्जुनी/मोर जि.गोंदिया

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २९.१०.२०२१

अपीलकर्ता	:	**अनुपस्थित**
जन माहिती अधिकारी	:	**उपस्थित**
प्रथम अपीलीय अधिकारी	:	**उपस्थित(प्रतिनिधी)**

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
१६.०५.२०१९	०३.११.२०२०	२२.०७.२०१९	२९.१०.२०२०

अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये दि. १६.०५.२०१९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर केला आहे. सदर अर्जान्वये त्यांनी "सन २०१९ मध्ये सडक/अर्जुनी तालुक्यातील मुंडीपार (ईश्वरदास) तेथील इलेक्ट्रिक पॉवर हाऊस मध्ये अवैध रेती उल्लंघन साठा जमा असल्याबाबत," माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतीसाद न दिल्यामुळे अपिलार्थी यांनी **दिनांक २२.०७.२०१९ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२९.१०.२०२० रोजी सुनावणी घेवून, "जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार उपविभागीय अधिकारी, अर्जुनी/मोर यांनी अपीलार्थी यांना त्यांनी जोडपत्र "अ" मध्ये मागितलेली माहिती त्वरीत विनामुल्य पुरविण्यात यावी, असा आदेश पारीत केला.

अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दिनांक ३०.१०.२०१९ रोजीच्या अर्जान्वये "कोणत्याच प्रकारचा पत्रव्यवहार केला नाही. तसेच, मागितलेली माहिती मिळाली नाही," असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपीलावर आज दिनांक २९.१०.२०२१ रोजी सुनावणी ठेवण्यात आली असून आज रोजी सुनावणी दरम्यान अपीलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.एम.यु.गेडाम उपस्थित असून

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, श्री. आकाश अवतारे यांच्या तर्फे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.एम.यु.गेडाम उपस्थित आहेत.

आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे आयोगास प्रत्यक्ष ऐकता आले नाही. परंतु, अपीलार्थी यांनी आयोगास केलेल्या द्वितीय अपील अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना विहीत मुदतीत कोणताही प्रतीसाद दिलेला नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनांही सुचीत करण्यात येते की, प्राप्त माहिती अर्जाचा विहीत मुदतीत निपटारा करण्यात यावा. अन्यथा, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग झाल्यामुळे शास्तीस पात्र ठरतील. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अर्जुनी मोर यांचा आदेश दि.२९.१०.२०२० अन्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी जोडपत्र-अ मध्ये मागितलेली माहिती त्वरीत विनामूल्य पुरविण्याचा आदेश निर्गमित करण्यात आला होता. त्या अनुषंगाने दि.०३.११.२०२० रोजी संबंधित माहिती अपीलार्थीला विनामूल्य पुरविण्यात आली होती. त्या संदर्भातील अधिकृत पत्राची प्रत सुद्धा आयोगाला दाखल करण्यात आली होती. उत्तरवादी यांनी आयोगाला सादर केलेल्या कागदपत्राच्या अनुषंगाने अपीलार्थी यांना माहितीचे प्रदान झालेले आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

ठिकाण : नागपूर

दिनांक : २९.१०.२०२१

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

जावक क्रमांक-4396-दिनांक-30 DEC 2021